सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०१२०/सीआर-३३/२०२१/मा.तं. दिनांक: १७ नोव्हेंबर, २०२१

# -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय:-उत्तरतालिकेवरील हरकती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या परीक्षांकरीता परीक्षेनंतर प्रथम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात येते. प्रथम उत्तरतालिका प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यात उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्यास उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येतो. विहित मुदतीमध्ये टपालाद्वारे प्राप्त होणाऱ्या हरकती एकत्रित करुन संबंधित तज्ञांचे अभिप्राय घेण्यात येतात व त्यानुसार अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात येते.

**२.** प्रचलित पध्दतीनुसार उत्तरतालिका अंतिम करण्याबाबतच्या कार्यपध्दतीमध्ये कालानुरुप सुधारणा करण्याच्या दृष्टीने आयोगामार्फत आयोजित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या सर्व परीक्षांकरीता उत्तरतालिकेवरील उमेदवारांच्या हरकती केवळ विहित ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याची सुविधा आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

**३.** ऑनलाईन पध्दतीने हरकती सादर करण्याची सुविधा आयोगामार्फत दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजी नियोजित सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा २०२० पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**४.** ऑनलाईन पध्दतीने हरकती सादर करण्याकरीता कालावधी, हरकती विचारात घेण्यासंदर्भातील सूचना इत्यादी संदर्भात प्रत्येक परीक्षेकरीता स्वतंत्रपणे प्रसिध्दीपत्रक जारी करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग